# पुस्तिका – चार

## संस्थेने आपली कामे पूर्ण करण्यासाठी घालून दिलेले निकष.

हया खात्याची सर्व कामे अद्ययावत सुधारित मुंबई महानगरपालिका अधिनियम, १८८८ मधील तरतुदींनुसार आणि महानगरपालिकेचे कार्यपध्दतीविषयक नियम व विनियम, स्थायी आदेश आणि प्रथा-परंपरा, हयानुसार पार पाडले जाते. हया खात्याचे कामकाज सुरळीतपणे पार पाडता यावे म्हणून खात्याने काही कार्यपध्दती ठरवून दिली आहे.

4.1) आयुक्तांकडून आणि नगरसेवकांकडून प्राप्त झालेली पत्रे महानगरपालिका आणि तिच्या विविध समित्यांच्या कार्यक्रमपत्रिकांमध्ये समाविष्ट करण्यासाठी विशिष्ट कालमर्यादा विहित करण्यात आली आहे. परंतु प्रशासनाकडून काही तांतडीचे प्रस्ताव प्राप्त झाल्यास ते प्रस्ताव किंवा नगरसेवकांकडून प्राप्त झालेली पत्रे, ठरावांच्या सूचना, इत्यादी सक्षम प्राधिकाऱ्यांच्या आदेशान्वये संबंधित समितीच्या कार्यक्रमपत्रिकेमध्ये समाविष्ट करण्यात येतात.

4.2) हया खात्यातील प्रत्येक काम विहित कालमर्यादेतच पार पाडावयाचे असल्यामुळे संबंधित कर्मचारी वर्गाला कार्यालयीन कामकाजाच्या वेळेनंतरही थांबावे लागते. हया खात्याच्ये काम हे विशिष्ट व कठीण स्वरुपाचे असून, ते ठराविक कालमर्यादेत पूर्ण करुन द्यावे लागते.

4.3) महानगरपालिका आणि तिच्या विविध समित्यांच्या सभांमध्ये मंजूर झालेल्या ठरावांच्या प्रमाणित प्रती हया संबंधित खात्याला, प्रशासकीय अधिकारी (समिति) हयांजमार्फत तात्काळ पाठविण्यात येतात. कार्यक्रमपत्रिका आणि सभावृत्तांतांच्या प्रती सदस्यांना वेळेत वितरीत करण्यात येतात.